# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३७८-२२ दिनांक ०८/१२/२०२२

## वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतास अटक करुन पिडीत महिलांची सुटका. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखा, वसई यांची कामगिरी.

अर्नाळा पोलीस ठाण्याचे हद्दीत हॉटेल डॉल्फीन कॉटेज (तुळसाई फार्म हाउस) कळंब याठिकाणी पिडीत मुलींना पैशाचे आमिष दाखवुन त्यांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करुन गि-हाईकांकडून मिळालेले पैसे घेत असल्याबाबतची गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक शाखा, वसईचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना मिळाली होती.

त्याअनुषंगाने बोगस गि-हाईकामार्फत वेश्यादलाल मॅनेजर विशाल शिवाजी हिरे याचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली व सापळा पंचनामा करुन वेश्यादलाल आरोपी नामे विशाल शिवाजी हिरे, वय २२ वर्षे, मुळ रा. एरंड गाव ता. येवला, जिल्हा नाशिक सध्या रा. डॉल्फीन कॉटेज (तुलसाई फार्महाउस) मोगरा वाडी रोड, कळंब यास ताब्यात घेण्यात आले. आरोपी नामे १) विशाल शिवाजी हिरे, वय २२ वर्षे, मुळ रा. एरंड गाव ता. येवला, जिल्हा नाशिक सध्या रा. डॉल्फीन कॉटेज (तुलसाई फार्महाउस) मोगरा वाडी रोड, कळंब तसेच लॉज मालक नामे २) दिलीप लक्ष्मण घरत व चालक नामे ३) अभिषेक बाबु चंदन यांच्याविरुध्द अर्नाळा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं ३८५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७०(१), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून २ पिडीत महिलांची वेश्या व्यवसायापासुन सुटका केली आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, वसई युनिटचे पो.नि. संतोष चौधरी व पो.हवा.शेटये, किणी, शिंदे, म.पो.हवा. डोईफोडे, तिवले, चालक पो.हवा. पागी सर्व नेम. अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी केली आहे.

----०००----